# एबीबीच्या 'डिजिटल एक्स्पो'त के.के. वाघला प्रथम पारितोषिक

## सलग दुस-या वर्षी प्रथम क्रमांक



**नाशिक : प्रतिनिधी**

एबीबी कंपनी नाशिकतर्फे उद्योग ४. ० च्या दिशेने फॅक्टरी डिजिटलायझेशनला प्रोत्साहन देण्यासाठी डिजिटल एक्स्पो नुकतेच आयोजन करण्यात आले. यात के के वाघ अभियांत्रिकी शिक्षण आणि संशोधन महाविद्यालय, नाशिक च्या पाच विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. के.के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील योगिता जाधव (इलेक्ट्रिकल विभाग ), रितेश बोरसे (कॉम्प्युटर विभाग ), वेदिका यादव (आय टी विभाग), रितेश साखरे (ई अँड टीसी विभाग) आणि शरयु काकड (मेकॅनिकल विभाग) यांचा सहभाग होता.या विद्यार्थ्यांना बॉश कंपनीचे उपाध्यक्ष रमेश शालीग्राम यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी ए.बी.बी शिक प्लांट हेड गणेश कोठावदे, ए.बी.बी एच आर हेड दयानंद कुलकर्णी, मनोज वाघ, डॉ. प्रमोद शहाबादकर आदी उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अभ्यासक्रम सांभाळून तीन महिने आठवड्याचे दोन दिवस ए.बी.बी कंपनी येथे डॉ. एस. सर्वानन यांच्या मार्गदर्शनाखाली प्रोजेक्टवर काम केले. यादरम्यान विद्यार्थ्यांनी कमीत कमी कागदांचा वापर, फाईल व्यवस्थापन, कागदपत्रे शोधण्यासाठी लागणारा विलंब टाळण्यासाठी डिजिटल पोर्टल तयार केले. के.के.वाघ अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेले पोर्टलचा कंपनीच्या कार्यक्षमतेसाठी नकीच फायदा होईल असे ए.बी.बी नाशिक प्लांट हेड गणेश कोठावदे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण विकसित होण्याच्या दिशेने ए.बी.बी कडून के के वाघ अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी दिल्याबद्दल संस्थेचे प्राचार्य डॉ. के एन नांदुरकर यांनी ए.बी.बी कंपनीच्या टीमचे आभार मानले. वाघ संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, संचालक मंडळ, सचिव प्रा के एस बंदी, विभाग प्रमुख डॉ. एस.एम. कमलापूर, डॉ. आर के मुंजे, डॉ. पी.डी.भामरे,डॉ.डी.एम.चांदवडकर व डॉ. पी. बी. कुशारे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**Gavkari 06-03-2025**